प्रकरण चौथे

कर्ज रचना व नफा विभागणी

प्रकरण ४ थे

कर्ज रचना व नफा विभागणी

प्रस्तावना :

कोणतीही सहकारी पतसंस्था भांडवली नफा मिळविण्याच्या उद्देशाने स्थापन झालेली नसते. विशेषतः संस्थाधारकांना भागावर लाभांश अणि ठेवीदारांना ठेवीवरील व्याज देण्याच्या दृष्टीने रोखता व लाभता यामध्ये योघग्य तो समन्वय साधून आपल्या जवळील भांडवल आणि ठेवी रुपाने गोळा झालेल्या पैशाचा उपयोग संस्थेच्या गरजू सभासदांना कर्जे देण्यासाठी केला जातो. साधारणपणे कर्जे देताना कर्जदाराची कर्ज परतफेडीची क्षमता, कर्जाचा हेतू, कर्जाची मुदत, तारणाचे स्वरुप इत्यादी मार्गदर्शक तत्वे आधारभूत मानली जातात. साधारणपणे प्राथमिक अवस्थेत कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेकडून सभासदांना कर्जे देताना पगाराची रक्कम दि'वारात घेतली जाते. तसेच संस्थेच्या सभासदांच्या परस्पर पगारातून नियमितपणे कर्ज परतफेड होत असल्याने भांडवल उभारणी होवू शकते. परिणामी नवीन कर्जे अदा करणे सुलभ जाते. या संस्थेकडून कर्जाऊ रक्कमेच्या वाढीमध्ये पूढील कल आढळतो.

कोष्टक क्रमांक - ४:१

कर्ज रक्कमेतील वाढ

अ.नं.	वर्षे	कर्जाची रक्कम (रुपये)	कर्ज रक्कमेतील वार्षिक वाढ (%)
१	१९७६-७७	१,८१,१५०.००	-
२	१९७७-७८	२,४९,७५०.००	३८
३	१९७८-७९	२,६०,७५०.००	४
४	१९७९-८०	४,५१,७००.००	७३
५	१९८०-८१	३,८५,०३०.००	-१५
६	१९८१-८२	६,१३,७५०.००	५९
७	१९८२-८३	९,३९,०००.००	५३
८	१९८३-८४	१०,१७,३००.००	८
९	१९८४-८५	१०,४३,३००.००	३
१०	१९८५-८६	३१,३८,२००.००	२००
११	१९८६-८७	२७,१२,७००.००	-१४
१२	१९८७-८८	५०,६२,८००.००	८७
१३	१९८८-८९	५०,४८,२५०.००	-०.२८
१४	१९८९-९०	५७,५९,०००.००	१४
१५	१९९०-९१	४६,७८,१००.००	-१९
१६	१९९१-९२	८२,४०,९००.००	७६

आधार :

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे सन १९७६-७७ ते १९९१-९२ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

वरील कोष्टकावरुन असे दिसते की, सन १९७७-७८, १९७९-८०, १९८१-८२, १९८२-८३, १९८७-८८ आणि १९९१-९२ या वर्षात संस्थेच्या सभासदांना केलेल्या कर्ज पुरवठ्यातील वार्षिक वाढ जादा आहे. ती सरासरी ६४.३३% इतकी आहे. त्याचे कारण सभासदांनी केलेली कर्जाची वाढती मागणी होय.

सन १९८५-८६ या वर्षी कर्ज रक्कमेतील वार्षिक वाढ सर्वात जास्त म्हणजे २००% टक्के आहे. याचे कारण देखील सभासदांची कर्जास वाढती मागणी होय. तसेच संस्थेने कर्ज मर्यादा या वर्षी वाढवली त्याचा परिणाम कर्ज रक्कमेत वार्षिक वाढ जादा झाली.

सन १९७८-७९, १९८३-८४, १९८४-८५ आणि १९८९-९० या वर्षात संस्थेने सभासदांना केलेल्या कर्ज पुरवठ्यात झालेली वार्षिक वाढ अत्यंत मंदगतीने दिसते. ती सरासरी ८.६०% आहे. याचे कारण सभासदांची कर्जास मागणी अत्यंत कमी होती.

मात्र सन १९८०-८१, १९८६-८७, १९८८-८९ आणि १९९०-९१ या वर्षी संस्थेने सभासदांना केलेल्या कर्ज पुरवठ्यातील वार्षिक वाढ मागील वर्षाशी तुलना करता ती सरासरी ७.२५% नी घटलेली दिसते याचे कारण सभासदांची कर्जास घटलेली मागणी होय.

सन १९७६-७७ साली प्रति सभासद कर्ज पुरवठा ८७०.९१ रुपये होता. तो सन १९९१-९२ या वर्षी प्रति सभासद रुपये २१,०७६.४७ इतका झाला.

४:१ अल्प मुदत कर्जे :

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था आपल्या सभासदांना पोटनियम क्रमांक ६० ब नुसार अल्प मुदतीचा कर्ज पुरवठा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

करते. अल्प मुदतीचे कर्ज म्हणजे महिन्यास एक याप्रमाणे समान ३६ किंवा ३६ पेक्षा कमी मासिक हप्त्यामध्ये वसूल करावयाचे कर्ज होय. सन १९७६-७७ ते १९९१-९२ या काळात पतसंस्थेने अल्पकालीन कर्ज पुरवठा केलेला सतत् आहे. अल्पकालीन कर्ज पुरवठा केल्यामुळे कर्जाची परतफेड त्वरीत होते. तसेच सभासदांच्या मध्ये बचत प्रवृत्ती वाढीस लागते. त्याचप्रमाणे परतफेडीद्वारे परत कर्ज उभारणी करणे शक्य होते. व रोखता व लाभतेचा योग्य समन्वय साधला जातो व अशा कर्ज पुरवठ्यात सुरक्षितता ही जादा असते.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेने अल्पकालीन कर्ज पुरवठा विविध कारणांसाठी केला आहे. त्यासाठी पुढील कोष्टक मार्गदर्शक ठरते.

अ.नं.	वर्षे	अल्पमुदत कर्जे	मालमत्ता व किरकोळ दुरुस्ती	शेती	समारंभ	लघुउद्योग	शिक्षण	इतर कार्ये
१	१९७६-७७	५०,५००.०० (१००)	२,६००.०० (५.१४)	४,५००.०० (८.९१)	३,२००.०० (६.३३)	-	५००.०० (०.९९)	३९,७००.०० (७८.६१)
२	१९७७-७८	३१,२५०.०० (१००)	२,०००.०० (६.४)	२,०००.०० (६.४)	२,२००.०० (७.०४)	-	७,३००.०० (२३.३६)	१७,७५०.०० (५६.८०)
३	१९७८-७९	१९,५५०.०० (१००)	२,९५०.०० (१५.०८)	१,०००.०० (५.११)	१,०००.०० (५.११)	५००.०० (२.५५)	-	१४,१००.०० (७८.६१)
४	१९७९-८०	१९,६००.०० (१००)	४,७००.०० (२३.९७)	-	१,३००.०० (६.६३)	-	१,५००.०० (७.६५)	१२,१००.०० (७८.६१)
५	१९८०-८१	८,८५०.०० (१००)	१,०००.०० (११.२९)	६००.०० (६.७७)	४००.०० (४.५१)	-	-	६,८५०.०० (७८.६१)
६	१९८१-८२	१०,१५०.०० (१००)	१,०००.०० (९.८५)	-	-	-	-	९,१५०.०० (७८.६१)
७	१९८२-८३	७,१००.०० (१००)	१,२००.०० (१६.९०)	-	-	-	५००.०० (७.०४)	५,४००.०० (७८.६१)
८	१९८३-८४	११,१५०.०० (१००)	२,५००.०० (२१.८३)	-	२,५००.०० (२१.८३)	-	-	६,४५०.०० (७८.६१)
९	१९८४-८५	१०,४३,३००.०० (१००)	३,२३,३००.०० (३०.९८)	४०,६००.०० (३.८९)	८१,१००.०० (७.७७)	-	१,२००.०० (०.११)	५,८६,६००.०० (७८.६१)
१०	१९८५-८६	२६,७९,२००.०० (१००)	७,९२,७००.०० (२९.५८)	४५,०००.०० (१.६७)	३७,०००.०० (१.३८)	-	-	१८,०४,५००.०० (७८.६१)
११	१९८६-८७	२१,२६,१००.०० (१००)	२,९९,०००.०० (१४.०६)	२५,०००.०० (१.१७)	१५,०००.०० (०.७०)	१५,०००.०० (०.७०)	-	१७,७२,१००.०० (७८.६१)
१२	१९८७-८८	३६ ०६,३००.०० (१००)	७,८८,५००.०० (२१.८६)	२५,०००.०० (०.६९)	२१,०००.०० (०.५८)	-	-	२७,७१,८००.०० (७८.६१)
१३	१९८८-८९	४९,४३,६००.०० (१००)	२०,०६,०००.०० (४०.५७)	८२,५००.०० (१.६६)	९२,५००.०० (१.८७)	-	-	२७,६२,६००.०० (७८.६१)
१४	१९८९-९०	५७,५९,०००.०० (१००)	१९,९२,८००.०० (३४.६०)	१,१०,०००.०० (१.९१)	४५,०००.०० (०.७८)	-	-	३६,११,२००.०० (७८.६१)
१५	१९९०-९१	४६,७८,१००.०० (१००)	१४,८७,५००.०० (३१.७९)	५४,०००.०० (१.१५)	४५,०००.०० (०.९६)	-	-	३०,९१,६००.०० (७८.६१)
१६	१९८३-८४	८२,४०,१००.०० (१००)	१५,२९,३००.०० (१८.५५)	४०,०००.०० (०.४८)	१,९६,०००.०० (२.३७)	-	२५,०००.०० (०.३०)	६४,५०,६००.०० (७८.६१)

* कंसातील आकडे अल्पमुदत कर्जाशी शेकडेवारी दर्शवितात.

आधार : कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे सन १९७६-७७ ते १९९१-९२ पर्यंतची माहितीपत्रके.

वरील कोष्टकावरून असे दिसते की, सभासदांनी अलिकडच्या काळात अल्पमुदतीच्या कर्जासच जादा मागणी केलेली आहे. याचे कारण सभासदांच्या पगारात वाढ झाल्यामुळे त्यांचा राहणीमान दर्जा उंचावला आहे. त्यामुळे कमी काळात ते कर्जाची व्यवस्थीत परतफेड करु शकतात.

सन १९७६-७७ ते १९८३-८४ या आठ वर्षाच्या काळात अल्पकालीन कर्जात ७७.३२ % घट झालेली आढळते. म्हणजेच सरासरी प्रत्येक वर्षी ९.६६ टक्के घट झालेली आढळते. याचे कारण सभासदांनी कर्जासाठी कमी मागणी केली. मात्र सन १९८४-८५ ते सन १९९१-९२ या आठ वर्षाच्या काळात अल्पकालीन कर्जात ६८९.८८% वाढ झाली आहे. म्हणजेच प्रत्येक वर्षी सरासरी ८६.२३ % वाढ झालेली आहे.

सन १९७६-७७ या वर्षी सभासद संख्या २०८ असल्याने प्रति सभासद अल्पकालीन कर्ज २४२.७८ रुपये होते. ते सन १९९१-९२ या वर्षी सभासद संख्या ३९१ असल्याने २१,०७६.४७ रुपये झाले.

सन १९७६-७७ ते १९८३-८४ या आठ वर्षाच्या काळात मालमत्ता व किरकोळ दुरुस्ती या कारणांसाठी केलेला कर्ज पुरवठा एकूण कर्ज पुरवठ्याच्या सरासरी १३.८० % आढळतो. मालमत्तेमध्ये घर बांधणी व प्लॉट खरेदीचा समावेश होतो. मात्र १९८४-८५ ते १९९१-९२ या आठ वर्षात मालमत्ता व किरकोळ दुरुस्ती या कारणांसाठी केलेला कर्ज पुरवठा एकूण कर्ज पुरवठ्याच्या सरासरी २७.७४ टक्के आहे. म्हणजेच यात वाढ झालेली आहे.

सन १९७६-७७ या वर्षी मालमत्ता व किरकोळ दुरुस्ती या वरती प्रति सभासद केलेला कर्जपुरवठा १२.५० रुपये होता. तो १९९१-९२ या वर्षी प्रति सभासद ३,९११.२५ रुपये झाला.

सन १९७६-७७ ते १९८३-८४ या आठ वर्षात संस्थेने शेतीसाठी फक्त चारच वर्षे कर्ज पुरवठा केला आहे. त्यामध्ये विहीर, उपसा सिंचन योजना,यंत्रे खरेदी, बैल, गाय, म्हैस इत्यादी खरेदीचा समावेश होतो. सदर कर्ज पुरवठा एकूण कर्ज पुरवठ्याच्या सरासरी ६.७९ % आढळतो. मात्र सन १९८४-८५ ते १९९१-९२ या आठ वर्षाच्या काळात तो १.५७ % आहे. म्हणजेच शेतीसाठी केला गेलेल्या कर्ज पुरवठ्याचे प्रमाण घटत आहे. सन १९७६-७७ या वर्षी शेतीसाठी केलेल्या कर्ज पुरवठ्याचे प्रमाण प्रति सभासद २१.६३ रुपये होते. ते १९९१-९२ या वर्षी १०२.३० रुपये झाले.

संस्थेने विविध प्रकारच्या घरगुती समारंभासाठी अल्पकालीन कर्ज पुरवठा केलेला आहे. यामध्ये मुलामुलींचे लग्न, जावळ, मुंज इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. सन १९७६-७७ ते १९८३-८४ या आठ वर्षाच्या काळात विविध प्रकारच्या समारंभासाठी केलेला कर्ज पुरवठा फक्त ६ वर्षे केला आहे. तो एकूण कर्ज पुरवठ्याच्या सरासरी ८.५७ % आहे. मात्र सन १९८४-८५ ते १९९१-९२ या आठ वर्षाच्या काळात एकूण कर्ज पुरवठ्याच्या सरासरी २.०५% इतका आहे. याचा अर्थ समारंभासाठी केलेला कर्ज पुरवठ्याचा हिस्सा घटत गेला आहे.

सन १९७६-७७ या वर्षी समारंभ या कारणासाठी केलेला कर्ज पुरवठा प्रति सभासद १५.३८ रुपये होता. तो १९९१-९२ या वर्षी प्रति सभासद ५०१.२७ रुपये झाला.

संस्थेकडून लघुउद्योगासाठी फक्त सन १९७८-७९ व १९८६-८७ या दोनच वर्षी अल्पकालीन कर्ज पुरवठा केलेला दिसतो. त्याचे एकूण कर्ज पुरवठ्याशी प्रमाण अनुक्रमे २.५५ % व ०.७०% आहे. लघु-उद्योगात पिठाची गिरणी, सायकल दुकान, विटभट्टी इत्यादींचा समावेश होतो.

संस्थेने शिक्षणासाठी सन १९७६-७७ ते १९७७-७८, १९७९-८० १९८२-८३, १९८४-८५ आणि सन १९९१-९२ या सहा वर्षातच कर्ज पुरवठा केला आहे. तो एकूण कर्ज पुरवठ्याच्या सरासरी ६.५७ % आहे. हा प्रामुख्याने उच्च शिक्षणासाठी आहे.

संस्थेने सभासदांना इतर कार्यासाठीही अल्पकालीन कर्ज पुरवठा केला आहे. यामध्ये घरगुती कारणांचा जादा समावेश आहे. इतर कार्यात आजारपण, कोर्ट कामे, मोटरसायकल खरेदी तसेच विविध घरगुती आवश्यक वस्तुंची खरेदी या गोष्टींचा समावेश होतो. इतर कार्यासाठी केलेल्या कर्जपुरवठ्याचे प्रमाण सर्वात जादा आहे.

सन १९७६-७७ ते १९८३-८४ या आठ वर्षाच्या काळात इतर कार्यासाठी केलेल्या कर्ज पुरवठ्याचे प्रमाण एकूण कर्जाच्या सरासरी ७१.१३ % आहे. ते १९८४-८५ ते १९९१-९२ या आठ वर्षात एकूण कर्जाच्या सरासरी ६८.३३% इतके झाले. म्हणजेच इतर कार्याच्या कर्जाच्या हिश्श्यात घट झालेली दिसते.

सन १९७६-७७ या वर्षी इतर कार्यासाठी प्रति सभासद १९०.८० रुपये संस्थेने अल्पसालीन कर्ज पुरवठा केला होता. तो सन १९९१-९२ या वर्षी प्रति सभासद १६,४९७.७० रुपये झाला.

४:२ मध्यम मुदत कर्जे :

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था आपल्या सभासदांना पोटनियम क्रमांक ६० ब नुसार मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा करते. मध्यम मुदतीचे कर्ज म्हणजे महिन्यास एक याप्रमाणे

समान ६० किंवा ६० पेक्षा कमी परंतु ३० पेक्षा आधिक हप्त्यांमध्ये वसूल करावयाचे कर्ज होय. सन १९७६-७७ ते १९८३-८४ आणि सन १९८५-८६ ते १९८८-८९ या वर्षातच मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा संस्थेने केलेला आहे. सन १९८४-८५ या वर्षात व १९८८-८९ नंतर मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा केलेला नाही. मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा करण्यामागील उद्देश म्हणजे कर्ज उत्पादन कार्यात गुंतविल्यानंतर प्रत्यक्ष उत्पादन सुरु होण्यास अधिक वेळ लागतो त्यासाठी कर्जाची मुदत जादा असते. तसेच अशा कर्जात लाभता जादा असते. संस्थेने विविध कारणांसाठी मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा केला आहे. त्याची माहिती पुढील कोष्टक क्रमांक ४:३ मध्ये दिली आहे.

कोष्टक क्रमांक ४:३

मध्यम मुदत कारणपरत्वे कर्जवाटप वर्गीकरण

अ.नं.	वर्षे	मध्यम मुदत कर्जे	मालमत्ता व किरकोळ दुरुस्ती	शेती	समारंभ	लघुउद्योग	व्यापार	शिक्षण	पूर्वीचे कर्ज परत करण्यासाठी	इतर कार्ये
१	१९७६-७७	१,३०,९५०.०० (१००)	१७,६००.०० (१३.४७)	५,९००.०० (४.५१)	७,२००.०० (५.५१)	-	-	-	-	९९,९५०.०० (७६.५०)
२	१९७७-७८	२,१८,५००.०० (१००)	५९,५००.०० (२७.२३)	४४,७००.०० (२०.४५)	२१,६००.०० (९.८८)	३,०००.०० (१.३७)	-	-	६,०००.०० (२.७४)	८३,७००.०० (३८.३०)
३	१९७८-७९	२,४१,२५०.०० (१००)	९९,९५०.०० (४१.४३)	१८,७००.०० (७.७५)	४१,३००.०० (१७.१२)	३,०००.०० (१.२४)	-	३,०००.०० (१.२४)	-	७५,७००.०० (३१.३८)
४	१९७९-८०	४,३२,१००.०० (१००)	१,८८,९००.०० (४३.७१)	६०,०००.०० (१३.८८)	२७,७००.०० (६.४१)	-	-	-	१५,०००.०० (३.४७)	१,४१,५००.०० (३२.७४)
५	१९८०-८१	३,७५,१८०.०० (१००)	१,१६,३५०.०० (३०.३२)	२७,८००.०० (७.४१)	४०,०००.०० (१०.६६)	-	-	-	२,५००.०० (०.६६)	१,८९,५३०.०० (५०.३८)
६	१९८१-८२	६,०३,६००.०० (१००)	२,०७,५००.०० (३४.३७)	८,२००.०० (१.३५)	५३,०००.०० (८.७८)	-	५,०००.०० (०.८२)	-	९,०००.०० (१.४९)	३,२२,९००.०० (५३.४९)
७	१९८२-८३	९,३१,९००.०० (१००)	३,२१,०००.०० (३४.४४)	११,०००.०० (१.१८)	९५,७००.०० (१०.२६)	-	-	-	-	५,०४,२००.०० (५४.१०)
८	१९८३-८४	१०,०५,८५०.०० (१००)	२,६४,८००.०० (२६.३२)	४९,०००.०० (४.८७)	९०,२००.०० (८.९६)	-	५,०००.०० (०.४९)	२८,५००.०० (२.८३)	-	५,६८,३५०.०० (५६.५०)
९	१९८४-८५	-	-	-	-	-	-	-	-	-
१०	१९८५-८६	४,५९,०००.०० (१००)	१,२६,५५०.०० (२७.५७)	६५,०००.०० (१४.१६)	६५,०००.०० (१४.१६)	-	-	-	-	२,५२,४५०.०० (५५.००)
११	१९८६-८७	५,८६,६००.०० (१००)	१,२२,०००.०० (२०.७९)	११,०००.०० (१.८७)	११,०००.०० (१.८७)	-	-	-	-	४,५३,६००.०० (७७.३२)
१२	१९८७-८८	१४ ५६,५००.०० (१००)	४,४०,०००.०० (३०.२०)	६०,०००.०० (४.११)	६०,०००.०० (४.११)	-	-	-	-	९,१६,५००.०० (६२.९२)
१३	१९८८-८९	१,०४,६५०.०० (१००)	४८,२००.०० (४६.००)	-	-	-	-	-	-	५६,४५०.०० (५३.९४)

* केसातील आकडे मध्यम मुदत कर्जाशी शेकडेवारी दर्शवितात.

* आधार : कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे सन १९७६-७७ ते १९९१-९२ पर्यंतची माहितीपत्रके.

वरील कोष्टकावरुन असे दिसते की, सन १९७६-७७ ते सन १९८३-८४ या आठ वर्षाच्या काळात मध्यम कालीन कर्जात ६६९.८८% नी वाढ झालेली आहे. म्हणजेच सरासरी प्रत्येक वर्षी ८३.७३ % वाढ झालेली आढळते. आणि सन १९८५-८६ ते १९८८-८९ या चार वर्षाच्या काळात मध्यम कालीन कर्जात ७७.२०% नी घट झालेली आहे. म्हणजेच सरासरी प्रत्येक वर्षी १९.३० % नी घट झालेली आढळते. ह्या घटीचे महत्वाचे कारण म्हणजे संस्थेने शक्यतो मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा न करण्याचे धोरण अवलंबिले कारण वसूली ताबडतोब व्हावी व नवीन कर्ज पुरवठा सभासदांना करता यावा असे संस्थेचे धोरण झाले.

सन १९७६-७७ या वर्षी प्रति सभासद मध्य कालीन कर्ज वाटप ६२८.१२ रुपये होते ते सन १९८८-८९ साली ते २९६.४५ रुपये इतके झाले. म्हणजेच प्रति सभासद मध्यमकालीन कर्ज पुरवठ्यात घट झालेली आहे. असे असले तरी सन १९८५-८६ आणि सन १९८८-८९ ही दोनच वर्षे सोडली असता मध्यम कर्ज पुरवठा नेहमीच वाढला आहे असे कोष्टक क्रमांक ४:३ वरुन दिसते.

सन १९७६-७७ ते सन १९८३-८४ या आठ वर्षाच्या काळात मालमत्ता व किरकोळ दुरुस्ती या कारणांसाठी केलेला कर्ज पुरवठा एकूण कर्ज पुरवठ्याच्या सरासरी ३१.४८% आहे. मालमत्ता मध्ये घरबांधणी, प्लॉट खरेदी इत्यादिचा समावेश होतो. तसेच सन १९८५-८६ ते सन १९८८-८९ या चार वर्षाच्या काळात याच कारणांसाठी केलेला कर्ज पुरवठा सरासरी ३१.१४ % आहे. म्हणजेच तो जवळ जवळ स्थिर आहे.

सन १९७६-७७ यावर्षी मालमत्ता व किरकोळ दुरुस्ती यावरती प्रति सभासदसभासद केलेला कर्ज पुरवठा ८४.६१% रुपये होता. तो

१९८८-८९ या वर्षी प्रति सभासद १३६.५४ रुपये आहे. तुलनात्मकदृष्ट्या इतर वर्षापेक्षा तो कमी आढळतो. याचे महत्वाचे कारण म्हणजे १९८८-८९ या वर्षापासून मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा बंद करण्याचे धोरण संस्थेने स्वीकारले.

सन १९७६-७७ ते सन १९८३-८४ या आठ वर्षात संस्थेने शेतीसाठी जो मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा केला आहे तो विहीर खुदाई व दुरुस्ती, उपसा जलसिंचन योजना, यंत्रसामुग्री खरेदी व दुरुस्ती व म्हैस, गाय, बैल इत्यादि खरेदीसाठी केला आहे. वरील कालावधीत संस्थेने केलेल्या एकूण कर्ज पुरवठ्याच्या सरासरी ७.६७% कर्ज पुरवठा शेतीसाठी केला आहे. तसेच संस्थेने नंतर सन १९८५-८६ आणि सन १९८७-८८ या दोन वर्षी शेतीस मध्यम कालीन कर्ज पुरवठा केला आहे तो अनुक्रमे ३.२०% आणि २.७४% इतका आहे. जो पूर्वी पेक्षा घटत गेलेला आहे. याचे कारण संस्थेच्या संबंधीत सभासदांच्याकडून या कालावधीत कर्जाची मागणी तुलनात्मकदृष्ट्या पूर्वीपेक्षा कमी झालेली आहे. सन १९७६-७७ या वर्षी शेतीसाठी केलेल्या कर्ज पुरवठ्याचे प्रति सभासद प्रमाण २८.३६ रुपये होते ते सन १९८७-८८ या वर्षी प्रति सभासद ११७.९९ रुपये झाले.

सन १९७६-७७ ते सन १९८३-८४ या आठ वर्षाच्या काळात विविध प्रकारच्या समारंभासाठी केलेल्या कर्ज पुरवठ्याचे प्रमाण एकूण कर्जाच्या सरासरी ९.६९% आहे. यामध्ये लग्न, मुंज, बारसे, विविध प्रकारचे सण इत्यादींचा समावेश होतो. मात्र याच कारणांसाठी १९८५-८६ ते सन १९८७-८८ या तीन वर्षाच्या काळात एकूण कर्जाच्या सरासरी ६.७१% कर्ज पुरवठा केला आहे जो घटत आहे. सन १९८८-८९ या वर्षी समारंभासाठी संस्थेने कर्ज पुरवठा केलेला नाही. सन १९७६-७७ या वर्षी समारंभासाठी केलेल्या मध्यम मुदतीच्या कर्ज पुरवठ्याचे प्रति सभासद प्रमाण ३४.६१ रुपये आहे. ते सन १९८७-८८ या वर्षी प्रति सभासद १७६.९९ रुपये झाले.

संस्थेकडून पीठ गिरणी, वर्कशॉप, इत्यादि सारख्या लघुउद्योगांसाठी मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा फक्त सन १९७७-७८ आणि सन १९७८-७९ या दोनच वर्षी झालेला दिसतो तो एकूण कर्ज पुरवठ्याच्या अनुक्रमे १.३७% आणि १.२४% इतका आहे.

संस्थेकडून कापड दुकान, किराणा दुकान इ. व्यापारी कारणांसाठी मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा सन १९८१-८२ आणि सन १९८३-८४ या दोनच वर्षी झालेला दिसतो. तो एकूण कर्ज पुरवठ्याच्या अनुक्रमे ०.८२% आणि ०.४९% आहे. जे अतिशय कमी आहे. कारण संबंधीत सभासदांनी केलेली मागणी कमी दिसते.

संस्थेकडून शिक्षणासाठी मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा सन १९७८-७९ आणि सन १९८३-८४ या दोनच वर्षात झालेला दिसतो. तो प्रामुख्याने उच्च शिक्षणासाठी झालेला आहे. त्याचे एकूण कर्ज पुरवठ्याशी प्रमाण अनुक्रमे १.२४% आणि २.८३% आहे जो खूपच कमी आहे.

संस्थेने पुर्वीचे कर्ज परत करण्यासाठी म्हणून सन १९७७-७८, १९७९-८० ते १९८१-८२ या चार वर्षी मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा केला आहे. तो एकूण कर्ज पुरवठ्याच्या सरासरी २% इतका आहे.

संस्थेने इतर कार्यासाठीही मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा केला आहे. यामध्ये घरगुती कारणांचा जादा समावेश आहे. इतर कार्यात आजारपण, कोर्ट कामे, मोटरसायकल खरेदी, घरगुती आवश्यक वस्तूंची खरेदी इत्यादि गोष्टींचा समावेश होतो. संस्थेने १९७६-७७ ते सन १९८३-८४ या आठ वर्षाच्या काळात इतर कार्यासाठी केलेल्या कर्ज पुरवठ्याचे प्रमाण एकूण कर्जाच्या ४९.१७% आहे. ते सन १९८५-८६ ते

ते सन१९८८-८९ या चार वर्षाच्या काळात एकूण कर्जाच्या सरासरी ६२.२९% इतके झाले. म्हणजेच पूर्वीपेक्षा वाढलेले दिसते.

सन १९७६-७७ या वर्षी इतर कार्यासाठी प्रति सभासद कर्ज पुरवठ्याचे प्रमाण ४८०.५२ रुपये होते ते सन १९८८-८९ या वर्षी प्रति सभासद १५९.९१ रुपये झाले. म्हणजेच ते घटलेले आहे. याचे कारण सन १९८८-८९ पासूनच संस्थेने मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा कमी करण्याचे धोरण स्वीकारले.

४:३ **वसूल झालेले कर्ज व येणे कर्ज :**

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेने सभासदांना दिलेले कर्ज त्यांच्या परस्पर पगारातून मासिक हप्ते स्वरुपात वसूल केले जाते. त्यामुळे पतसंस्थेस कर्ज वसुली सुलभ बनते. त्याचा परिणाम थकबाकी वाढत नाही. शिवाय कर्ज वसुली नियमितपणे होत असल्याने वसूल झालेल्या कर्ज पुरवठ्यातून पुन्हा कर्ज सभासदांना जादा प्रमाणात देता येते. या पतसंस्थेचे वसूल झालेले कर्ज व वर्षा अखेरीस येणे असणारे कर्ज याबाबतच्या आकडेवारी वरुन पुढील निष्कर्ष काढता येतात.

कोष्टक क्रमांक ४:४

वसूल झालेले कर्ज आणि येणे कर्ज

अ.नं.	वर्षे	वसूल झालेले कर्ज (रुपये)	येणे बाकी कर्ज (रुपये)	येणेबाकी कर्जाचे वसूल कर्जाशी प्रमाण (%)
१	१९७५-७६	उपलब्ध	नाही -- -	-
२	१९७६-७७	१,२४,९८७.००	१,५८,६३०.००	१२६.६१
३	१९७७-७८	१,७९,५८३.००	२,२८,८३०.००	१२७.४२
४	१९७८-७९	२,१९,१३०.००	२,७०,४५०.००	१२३.४१
५	१९७९-८०	२,९८,६५०.००	४,२३,५००.००	१४१.८०
६	१९८०-८१	३,०६,०६५.००	५,०२,४६५.००	१६४.१६
७	१९८१-८२	४,४३,६९०.००	६,७२,५२५.००	१५१.५७
८	१९८२-८३	६,८६,२९०.००	९,२५,२६५.००	१३४.८२
९	१९८३-८४	८,८८,६००.००	१०,५३,९६५.००	११८.६०
१०	१९८४-८५	१०,६४,९२५.००	१०,३२,३४०.००	९६.९३
११	१९८५-८६	१९,८०,८८०.००	२१,८९,६६०.००	११०.५३
१२	१९८६-८७	२४,१५,६२७.००	२४,८६,७३३.००	१०२.९४
१३	१९८७-८८	४०,३१,६४३.००	३५,१७,८९०.००	८७.२५
१४	१९८८-८९	४४,५५,२१०.००	४१,१०,९३०.००	९२.२७
१५	१९८९-९०	५०,४२,६८५.००	४८,२७,२४५.००	९५.७२
१६	१९९०-९१	४३,२३,४२०.००	५१,८१,९२५.००	११९.८५
१७	१९९१-९२	७७,१०,८०५.००	५७,१२,०२०.००	७४.०७

आधार : कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे सन १९७६-७७ ते १९९१-९२ पर्यंतचे वा क अहवाल.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेच्या विधी व उपविधी नुसार कर्जे अदा करण्याची आणि कर्जे वसूल करण्याची पध्दत मुदत निहाय असल्याने येणेबाकी कर्जामध्ये मोठी वाढ झालेली दिसते. तथापी वरील कोष्टकावरुन येणेबाकी कर्जाचे वसूल कर्जाशी असणारे प्रमाण (टक्केवारी) याबाबत पुढील निष्कर्ष निघतात.

१) सन १९८०-८१ या वर्षी येणेबाकी कर्जाचे वसूल कर्जाशी असणारे प्रमाण सर्वोच्च आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे संस्थेची कर्ज अदा करण्याची पतमर्यादा वृध्दी होय.

२) सन १९९१-९२ या वर्षी येणेबाकी कर्जाचे वसूल कर्जाशी असणारे प्रमाण सर्वात न्यूनतम् आहे. त्याची दोन प्रमुख कारणे आहेत.

अ) सन १९९०-९१ या वर्षी बहुसंख्य कर्जदारांची कर्जे परत करण्याची मुदत संपलेली होती. त्यामुळे वसूल कर्जाचे प्रमाण जादा आहे.

ब) संस्थेने सन १९८९-९० या वर्षापासून मध्यम मुदतीचे कर्ज न देण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे एकुण कर्ज पुरवठ्यात मंदगतीने वाढ झालेली आढळते.

३) सन १९८४-८५, १९८७-८८ ते १९८९-९० या चार वर्षात येणेबाकी कर्जाचे वसूल कर्जाशी असणारे सरासरी प्रमाण ९३.०४ % आढळते.

४) सन १९७८-७९, १९८३-८४, १९८५-८६, १९८६-८७ आणि १९९०-९१ या पांच वर्षात येणेबाकी कर्जाचे वसूल कर्जाशी असणारे सरासरी प्रमाण ११३.०४ टक्के आढळते. म्हणजेच येणेबाकी कर्जाचे वसूल झालेल्या कर्जाशी असणारे प्रमाण जवळ जवळ समसमान आहे.

५) सन १९७६-७७, १९७७-७८, १९७९-८०, १९८१-८२ आणि १९८२-८३ या पांच वर्षात येणेबाकी कर्जाचे वसूल कर्जाशी असणारे सरासरी प्रमाण १३१.१०% आढळते. म्हणजेच येणेबाकी कर्जाचे वसूल झालेल्या कर्जाशी असणारे प्रमाण जास्त आहे.

अशा प्रकारे येणेबाकी कर्जाचे वसूल झालेल्या कर्जाशी असणारे प्रमाण सरासरी स्थूलपणे ९३.०४ ते १३१.१० या दरम्यान आढळते.

४:४ **नफा :**

सहकाराच्या मुलभूत तत्वाद्वारे सेवा तत्वास अग्रक्रम देण्यात आला आहे. म्हणजेच सहकारी संस्थांचा प्रधान हेतू नफा संपादन करणे हा नसून जनतेस व सभासदास सुविधा उपलब्ध करुन देणे हा आहे. पण काळाच्या ओघात भौतिक स्तरावरील विविधांगी आर्थिक घटकांचा साकल्याने विचार करुन नफा या संकल्पनेस प्राधान्य दिले आहे. अर्थशास्त्रीय दृष्ट्या वाटावा आणि नफा यामध्ये मुलगामी फरक आहे. उत्पादक घटकांची आर्थिक पिळवणूक करुन जो नफा संपादन केला जातो त्यास वाटावा म्हणतात. पण सहकारी संस्थांतर्गत उत्पादक घटकांचे न्याय मोबदले देवून जे वरकड प्राप्त केले जाते त्यास नफा असे संबोधले जाते. सहकारी संस्थांनी नफा संपादन करावा कि करु नये हा प्रश्न कालबाह्य ठरला आहे. कारण आधुनिक युगात सहकारी संस्था बरोबर सार्वजनिक व खाजगी क्षेत्राद्वारे विविधांगी सेवा सुविधा पुरविल्या जातात. गतिशील-तेच्या पार्श्वभुमीवर सहकारी संस्थांना भांडवलाची नितांत गरज भासते. विशेषतः सहकारी संस्थांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने नफ्याचा विशिष्ठ हिस्सा राखीव स्वरुपात ठेवावाच लागतो. सहकारी संस्था, आर्थिक बदलांना तोंड देण्याच्या दृष्टीने नफ्याचे वितरण करतात. त्याच बरोबर सहकारी संस्थाना जो नफा मिळतो त्याचे श्रेय सभासदांनाच द्यावे लागते. या सभासदांना नफ्याचा ठराविक हिस्सा लाभांश स्वरुपात देणे आवश्यक ठरते. दरम्यान लाभांशाचे वितरण कोणत्या पध्दतीने करावे - भागभांडवलाच्या पटीने की संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या पटीत? वस्तुतः सभासदाने सहकारी संस्थेशी निष्ठा राखून, विश्वास बाळगून ज्या प्रमाणात व्यवहार केले जातात त्या उलाढालीच्या पटीत लाभांशाचे वितरण करणे उचीत ठरते.

सहकारी संस्थांना जो नफा प्राप्त होतो त्यास सामाजिक आशय प्राप्त होतो. म्हणजेच समाज कल्याणासाठी, समाजाच्या आणिबाणी कालीन परिस्थितीत नफ्याचा विशिष्ठ हिस्सा वापरला जातो. भारतासारख्या सांस्कृतिक मुल्ये धारण करणाऱ्या राष्ट्रात समाज एकसंघ बनविण्यासाठी जबाबदार ठरणाऱ्या धर्म संकल्प-

BARR. BALASAHEB KHANDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

नेस प्राधान्य दिले जाते कि, ज्यामधून धर्मादाय निधीची उभारणी होते. सहकारी संस्थेच्या नफ्यास जबाबदार ठरणारे प्रमुख घटक म्हणजे संस्थेचा कर्मचारी वर्ग आणि संस्थेशी व्यवहार करणारे सभासद होय. अशा प्रकारे सहकारी संस्थाना जो नफा प्राप्त होतो त्या नफ्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष विनियोग संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी केला जातो.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेकडून सहकार कायद्याची चौकट अबाधित ठेवून नफा प्राप्त केला जातो. या संबंधीत पुढील कोष्टक मार्गदर्शक ठरते.

कोष्टक क्रमांक ४:५

एकुण नफ्यातील वाढ

अ.नं.	वर्षे	एकुण नफा (रुपये)	एकुण नफ्यात वार्षिक वाढ (%)
१	१९७६-७७	१३,०५३.३१	--
२	१९७७-७८	१३,५३४.४२	३
३	१९७८-७९	२२,१९८.७३	६४
४	१९७९-८०	२७,९७२.७३	२६
५	१९८०-८१	३४,४२९.५०	२३
६	१९८१-८२	४२,३९५.११	२३
७	१९८२-८३	६४,०२२.०९	५१
८	१९८३-८४	८७,४६२.५३	३७
९	१९८४-८५	१,०४,९१५.२८	२०
१०	१९८५-८६	१,२३,२३०.८६	१७
११	१९८६-८७	१,६३,६४२.८३	३३
१२	१९८७-८८	१,९१,६०७.२४	१७
१३	१९८८-८९	२,२४,१८४.४९	१७
१४	१९८९-९०	२,४४,९१५.७६	९
१५	१९९०-९१	२,८९,३०१.६०	१८
१६	१९९१-९२	३,०७,५८०.७५	६

आधार :

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे सन १९७६-७७ ते १९९१-९२ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

वरील कोष्टकावरुन असे दिसते कि, सन १९७९-८० ते १९८१-८२, १९८४-८५ ते १९८५-८६, १९८७-८८ ते १९८८-८९ या वर्षी पतसंस्थेच्या एकूण नफ्यात २०.४% इतकी सरासरी वार्षिक वाढ झाली आहे.

सन १९७७-७८, १९८९-९० आणि १९९१-९२ या वर्षी नफ्याच्या प्रमाणात घट झाली आहे. ती अनुक्रमे ३%, ९% आणि ६% आहे. याचे मुख्य कारण १९७४-७५ यावर्षी नवीनच पतसंस्था स्थापन झाल्यामुळे सुरवातीस नफ्याचे प्रमाण कमी राहणे सहाजिक आहे. १९८९-९० या वर्षी संस्थेने सभासदास कर्जाच्या व्याजावरती ७% सूट (रिबेट) दिली. त्याची रक्कम ४२,९७३.०० रुपये इतकी आहे. सन १९९१-९२ या वर्षी सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने संस्थेस दिलेल्या कर्जावरील व्याज दरात १४% वरुन १७% एवढी वाढ केली. परंतु ही वाढ बँकेने जुलै, १९९१ पासून केली आहे व संस्थेस तसे नोव्हेंबर, १९९१ या महिन्यात कळविले. या काळात पतसंस्थेने सभासदांना १५% व्याज दरानेच कर्ज पुरवठा केला. पतसंस्थेने जुलै, १९९१ ते ऑक्टोबर, १९९१ या काळात सभासदाकडून वाढीव व्याज दर घेतले नाही. त्याप्रमाणे यावर्षी पतसंस्थेकडून सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आयकर लेव्ही रुपाने ४०२८.०० रुपये कर घेतला आहे. त्यामुळे नफ्याचे प्रमाण घटले आहे. आयकर लेव्ही हा कर्जदार व्यक्ती किंवा संस्थांनी घेतलेल्या कर्जावरील व्याजाच्या रक्कमेवरती ३% दराने आकारला जातो. सदर पतसंस्थेने आयकर लेव्ही रुपाने ४,०२८.०० रुपये इतकी रक्कम सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस परिपत्रक क्रमांक - जा.क्र.अकौंटस्/बँकींग/बी/५७३७, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली दिनांक २४.०२.१९९२ नुसार जमा केली. ही रक्कम ०१.१०.९१ ते ३१.०३.९२ या कालावधीत पतसंस्थेने बँकेस भरलेल्या व्याजाच्या ३% इतकी आहे.

सन १९७८-७९, १९८२-८३, १९८३-८४ १९८६-८७ या वर्षी नफ्यात जादा वाढ झालेली दिसते. याचे कारण या काळात भागभांडवल, ठेवी यात वाढ झाली त्याचप्रमाणे कर्ज मर्यादा वाढविली गेली.

सन १९९०-९१ या वर्षी जरी १८% चा नफा दिसत असला तरी तो ९ महिन्याचा आहे. कारण सरकारच्या नवीन कायद्याप्रमाणे पतसंस्थेचे वर्ष १ जुलै ऐवजी १ एप्रिलला सुरु झाले.

सन १९७६-७७ ला प्रति सभासद नफा ६२.७५ रुपये इतका होता. तो सन १९९१-९२ या वर्षी ७८६.६५ रुपये इतका झाला.

४:५ नफा विभागणी :

सहकारी संस्थेचा मुलभूत घटक म्हणजे सभासद होय. सभासदांच्या संस्थेच्या सहभागावर संस्थेचे यश अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येक सभासदाने आपल्या सहकारी संस्थेशी प्रामाणिकपणे व्यवहार करावेत अशी अपेक्षा असते. त्याचप्रमाणे सहकारी संस्थेने सुध्दा आपल्या सभासदांना कमीतकमी खर्चात जास्त सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात अशी धारणा असते. त्यादृष्टीने सहकारी संस्था प्रयत्नशिल असतेच. परिणामी वर्षा अखेरीस सहकारी संस्थेला वरकड अगर नफा प्राप्त होतो. अर्थात संपादीत नफ्याचे वितरण कोणत्या तत्वाने करावयाचे हा प्रश्न निर्माण होतो. प्राथमिक अवस्थेत आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने एकूण नफ्याचा ठराविक हिस्सा सभासदांना दिलाच पाहिजे असे समर्थन केले. त्याचप्रमाणे संपादीत नफ्याचा अशा रितीने विनियोग करावा की, ज्याद्वारे सहकारी संस्था आर्थिकदृष्टा सक्षम व कार्यक्षम बनतील. अलिकडच्या काळात एकूण नफ्याचा ठराविक हिस्सा (संस्थेच्या विधी व उपविधीनुसार) राष्ट्रीय कार्यासाठी वापरला जात आहे. मात्र सभासद व संस्थात्मक पातळीवर नफ्याचा महत्तमी करणास प्राधान्य देवू नये. कारण नफ्याचा महत्तमी कारणांद्वारे सहकारी संस्थेचा मुलभूत पाया ढासळेल.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेच्या अधिनियम कलम क्रमांक ६४ ते ६९ व नियम क्रमांक ५० ते ५३ व ५५ मधील तरतुदीनुसार नफ्याची विभागणी खालील बाबींवरती केली जाते.

१) कमीतकमी २५% राखीव निधी करिता.

२) जास्तीत जास्त ९% (सध्या १२%) दराने लाभांश वाटण्याकरिता.

३) भागभांडवलाच्या २% नियम क्रमांक ५२ प्रमाणे उभारवयाच्या लाभांश समीकरण निधीकरिता. (सध्या शिल्लक नफ्याच्या १०%)

४) भागभांडवलाच्या २% टक्के नियम क्रमांक ५२ प्रमाणे उभारवयाच्या अधिलाभांश समीकरण निधीकरिता (१९८५-८६ पासून घेतला जात नाही)

५) नफ्याच्या १% तारणपत्र किंमत चढउतार निधीकरिता.(१९८५-८६ पासून घेतला जात नाही)

६) धर्मादाय निधी शिल्लक नफयाच्या २०%.

७) शिल्लक नफ्याच्या २०% पर्यंत विनावेतन काम करणाऱ्यांना मानधन देण्याकरिता (१९८३-८४ पासून असे मानधन दिले जात नाही.)

८) पतसंस्थेच्या पगारी कर्मचाऱ्यांना दोन महिन्याच्या पगारा एवढा बोनस. (१९८५-८६ पासून दिला जात नाही)

९) इमारत निधी शिल्लक नफ्याच्या २०%

१०) शिल्लक नफ्याच्या २०% पर्यंत विशेष अडचणीच्या वेळी गंगाजळीकरिता (स्पेशल इमर्जन्सी रिझर्व्ह फंडाकरिता १९८५-८६ पासून घेतला जात नाही)

११) शिल्लक नफ्याच्या २०% अधिलाभांश वाटपाकरिता. (१९८२-८३ पासून बंद केला आहे)

१२) शिल्लक नफ्याच्या २०% इतर उपयुक्त कारणांकरिता.

१३) संशयित व बुडीत कर्ज निधी शिल्लक नफ्याच्या २०% (१९८५-८६ पासून सुरु.)

१४) सदस्य कल्याण निधी शिल्लक नफ्याच्या १०%.

वरील सर्व घटकांच्या वरती नमूद केलेल्या प्रमाणात नफा विभागला जातो. व राहिलेली रक्कम पुढील वर्षाच्या नफ्यात मिळविली जाते.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेने वरील चौकटीत राहूननफ्याची विभागणी आपल्या गरजेनुसार व सोईनुसार केली आहे. त्यासाठी पुढील कोष्टक मार्गदर्शक ठरते.

नफा विभागणी

वर्ष (३० जून)	गंगाजळी निधी	सभासद लाभांश	लाभांश समीकरण निधी	अधिलाभांश समीकरण निधी	चलनवाढ किंमत चढ उतार निधी	धर्मादाय निधी	नोकर बोनस	इमारत निधी	विनावेतन काम करणाऱ्यांचे मानधन	सदस्य कल्याण निधी	स्पेशल इमर्जन्सी रिझर्वफंड	रिझर्व्ह निधी	बुडीत कर्ज	इतर उपयुक्त कारण निधी	नफा	शिल्लक एकूण नफा
१ १९७६-७७	३२६३.५० (२५)	५८३२.४० (४४.६८)	८०.०० (०.६१)	८०.०० (०.६१)	४०.०० (०.३०)	७५०.०० (५.७४)	४००.०० (३.०६)	२६००.०० (१९.०१)	—	—	-	-	-	-	७.४१ (०.०५)	१३०५३.३१ (१००)
२ १९७७-७८	३३३८.७५ (२५)	८३८१.१० (६१.९२)	३५.५० (०.२६)	३५.५० (०.२६)	१८.०० (०.१३)	३३६.०० (२.४८)	४००.०० (२.९५)	९००.०० (६.६४)	—	—	-	-	-	-	४४.५७ (०.३३)	१३५५४.४२ (१००)
३ १९७८-७९	५५४१.७५ (२५)	१४१०५.७० (६३.५४)	५१.०० (०.२२)	५१.०० (०.२२)	२५.५० (०.११)	४८५.०० (२.१८)	४००.०० (१.८०)	१५००.०० (६.७५)	—	—	-	-	-	-	३०.७८ (०.१३)	२२११८.७३ (१००)
४ १९७९-८०	६९९३.१८ (२५)	१८४८४.२० (६६.०७)	४१.१० (०.१७)	४८.१० (०.१७)	२३.१६ (०.०८)	४४४.५१ (१.६१)	४००.०० (१.४२)	१००.६४ (०.३५)	३७१.६० (१.३५)	१११.८४ (०.३९)	१८१.२० (०.६४)	१४४.१६ (०.५१)	-	११५.१६ (०.४१)	४६३.८८ (१.६८)	२७९७२.७३ (१००)
५ १९८०-८१	९१०९.०० (२५)	२२६६८.३० (६२.२२)	९३.१६ (०.२५)	९१.३० (०.२५)	४४.७४ (०.१२)	८८५.८० (२.४३)	७००.०० (१.९२)	१९२.१० (०.५२)	७०८.६० (१.९४)	२१३.५० (०.५८)	३४५.८० (०.९४)	२७६.६० (०.७५)	-	२२१.४० (०.६०)	८८५.२० (२.४३)	३६४२९.५० (१००)
६ १९८१-८२	१०५१८.७५ (२५)	२८१४८.४० (६६.३९)	७२.१६ (०.१७)	७१.५० (०.१६)	३५.०३ (०.०८)	६१३.६० (१.६३)	७००.०० (१.६५)	१३६.८० (०.३२)	५५५.०० (१.३०)	१५२.२० (०.३५)	२४६.२० (०.५८)	१९७.०० (०.४६)	-	१५७.६० (०.३७)	६३०.२७ (१.४८)	४२३९५.११ (१००)
७ १९८२-८३	१६००५.५२ (२५)	३५१६७.५० (५४.९३)	२५६.१८ (०.४०)	२५१.८४ (०.३९)	१२३.४० (०.१९)	२४४३.३७ (३.८१)	७००.०० (१.०९)	६४०.६१ (१.००)	१९५४.६१ (३.०५)	७११.८७ (१.११)	११५३.२३ (१.८०)	९२२.६० (१.४४)	-	७३८.०८ (१.१५)	२९५२.३२ (४.६१)	६४०२२.०९ (१००)
८ १९८३-८४	२१८६५.६३ (२५)	५६९११.२० (६५.०६)	८८.१४ (०.१०)	८७.१६ (०.१०)	२७.७० (०.०३)	११११.७७ (१.२७)	१५००.०० (१.७१)	१७३७.१४ (१.९८)	—	१३८९.७१ (१.५८)	५४८.५६ (०.६२)	-	-	४३८.९४ (०.५०)	१७५५.७८ (२.००)	८७४६२.५३ (१००)
९ १९८४-८५	२६२२८.८२ (२५)	६७१५२.०० (६४.००)	१३२.८६ (०.१२)	१३०.२२ (०.१२)	५०.०५ (०.०४)	१६६०.१६ (१.५८)	३७५.०० (१.३८)	२३०६.८१ (२.१९)	—	९२२.७५ (०.८७)	९११.१४ (०.९४)	-	-	७४२.११ (०.७५)	३१५१.६८ (३.०२)	१०४९१५.२८ (१००)
१० १९८५-८६	३०८०७.७१ (२५)	९११७१.६० (७४.६३)	१०.३१ (०.७)	-	-	१०.३१ (०.७)	-	१०.३१ (०.७)	—	४५.१५ (०.३५)	-	-	१०.३१ (०.७)	४५.१६ (०.३५)	-	१२३२३०.८६ (१००)
११ १९८६-८७	४०११०.७० (२५)	११३५१३.२० (६१.४१)	१८२७.७८ (१.११)	-	-	१८२७.७८ (१.११)	-	१८२७.७९ (१.११)	—	९१३.९० (०.५५)	-	-	१८२७.७८ (१.११)	९१३.९० (०.५५)	-	१६३६४२.८३ (१००)
१२ १९८७-८८	४७९०१.८० (२५)	१३९५३३.६० (७२.८२)	८३४.३७ (०.४३)	-	-	८३४.३७ (०.४३)	-	८३४.३७ (०.४३)	—	४१७.१८ (०.२१)	-	-	८३४.३७ (०.४३)	४१७.१८ (०.२१)	-	१९१६०७.२४ (१००)
१३ १९८८-८९	५४०४६.१२ (२५)	१५१४४५.२० (७१.१२)	१५३८.६४ (०.६८)	-	-	१५३८.६४ (०.६८)	-	१५३८.६४ (०.६८)	—	७६९.३१ (०.३४)	-	-	१५३८.६३ (०.६८)	७६९.३१ (०.३४)	-	२२४१८४.४१ (१००)
१४ १९८९-९०	६१२२८.४४ (२५)	१७८२०६.०० (७२.७६)	१०९६.१६ (०.४४)	-	-	१०९६.१६ (०.४४)	-	१०९६.१६ (०.४४)	—	५४८.०९ (०.२२)	-	-	१०९६.१६ (०.५५)	५४८.०९ (०.२२)	-	२४४९१५.७६ (१००)
१५ १९९०-९१	७२३२५.४० (२५)	१९४९५१.२० (६७.३८)	४४०३.४० (१.५२)	-	-	४४०३.४० (१.५२)	-	४४०३.४० (१.५२)	—	२२०१.७० (०.७६)	-	-	४४०३.४० (१.५२)	२२०१.७० (०.७६)	-	२८९३०१.६० (१००)
१६ १९९१-९२	७६८९५.२० (२५)	२११४८२.०० (६८.७५)	१९२६.३६ (०.६२)	-	-	३८४०.७१ (१.२४)	-	३८४०.७१ (१.२४)	—	१९२०.३५ (०.६२)	-	-	३८४०.७१ (१.२४)	३८४०.४१ (१.२४)	-	३०७५८०.७५ (१००)

* कंसातील अंक एकूण नफ्याशी शेकडेवारी दर्शवितात.

* आधार : कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे सन १९७६-७७ ते १९९१-९२ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

४:६ संस्थेचे नफा विभागणीचे घटक :

सन १९७६-७७ ते १९९१-९२ या काळातील संस्थेच्या नफ्याच्या विभागणीचे घटक पुढील प्रमाणे आहेत.

(१) राखीव निधी :

सहकारी संस्थांचा भांडवल वाढविण्याचा हा एक महत्वाचा मार्ग आहे. संस्थेला मिळणारा नफा सर्वच्या सर्व लाभांश रुपाने सभासदांच्या- मध्ये न वाटता त्यातील काही भाग आर्थिक अडचणीच्या वेळी संस्थेस उपयोगी पडावा म्हणून कायद्यानेच राखीव निधीत वर्ग केला जातो. हे प्रमाण नफ्याच्या २५% इतके असावे असे कायद्याने बंधन घातले गेले आहे. या निधीचा वापर संस्थेच्या प्रगतीसाठी व भविष्यकाळात निर्माण होणाऱ्या आर्थिक संकटावरती मात करण्यासाठी करता येतो.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था एकूण नफ्यापैकी २५% रक्कम राखीव निधीत जमा करते. वरील कोष्टकावरुन असे दिसते की, नफ्याच्या वाढी बरोबरच राखीव निधीचे प्रमाणही वाढत आहे. सन १९७६-७७ ला राखीव निधी ३,२६३.५० रुपये होता. तो सन १९९१-९२ या वर्षीपर्यंत ७६,८९५.२० रुपये पर्यंत वाढला.

(२) सभासद लाभांश :

सहकारी संस्थांना मिळणाऱ्या नफ्यातील काही भाग सभासदांना लाभांश रुपाने वाटला जातो. हा सभासदांनी संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात दिला जातो.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेने १९७६-७७ पर्यंत ७% लाभांश दिला. १९७७-७८ ते १९८२-८३ पर्यंत ९% लाभांश वितरण सभासदांना केले. नंतर सहकारी कायद्यातील बदलानुसार सन १९८३-८४ पासून १२% लाभांश सभासदांना वाटला जातो.

कोष्टक क्रमांक ४:६ वरुन असे दिसते की, सन १९७६-७७ या वर्षी एकूण नफ्याच्या ४४.६८% सभासद लाभांश वाटला. या वर्षा व्यतिरिक्त सन १९७७-७८ ते १९९१-९२ या काळात प्रति वर्षी सभासद लाभांशाच्या टक्केवारीच्या सरासरी ६६.७३% सभासद लाभांश वाटला गेला.

(३) लाभांश समीकरण निधी :

सहकारी संस्थांच्या कायद्यानुसार प्रत्येक संस्थेस नफ्यातून लाभांश समीकरणनिधी वेगळा काढावा लागतो. या निधीचा वापर जेव्हा एखाद्या वर्षी संस्थेस नफा कमी झाला तर संस्था कायद्याप्रमाणे १२% लाभांश वाटू शकत नाही अशा वेळी ही घट भरुन काढण्यासाठी या निधीचा वापर केला जातो. त्यामुळे सभासदांच्यामध्ये संस्थेबाबतचा एक प्रकारचा विश्वास निर्माण होतो.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेने या निधीत सन १९८६-८७ (१.११%) व १९९१-९१ (१.५२%) व्यतिरिक्त प्रतिवर्षी १% पेक्षा कमी रक्कम एकूण नफ्याच्या जमा केली आहे.

(४) अधिलाभांश समीकरण निधी व नोकर बोनस :

सहकारी संस्थांच्या कायद्यानुसार हा निधी उभा करता येतो. या निधीचा वापर पगारी कर्मचाऱ्यांना दोन महिन्याचा पगार इतका अधिलाभांश वाटण्याकरिता केला जातो. या निधीत शिल्लक नफ्याच्या २०% पर्यंत रक्कम जमा केली जाते. कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी

पतसंस्थेने सन १९८४-८५ पर्यंतच असा निधी उभा केला आहे. त्यामध्ये एकूण नफ्याच्या सरासरी ०.२५% रक्कम जमा केली आहे.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेच्या नोकर वर्गास नोकर बोनस दोन महिन्याच्या पगारा एवढा दिला जातो. १९७६-७७ ते १९७९-८० या कालावधीत नोकरांची संख्या स्थिर असल्याने हा बोनस स्थिर आढळतो. सन १९८०-८१ ते १९८२-८३ या कालावधीत सुध्दा नोकर बोनस स्थिर आढळतो. मात्र सन १९८३-८४ ते १९८४-८५ या काळात नोकर बोनस घटला आहे. याचे कारण म्हणजे संस्थेचा एक कर्मचारी ३१ मार्च पर्यंतच सेवेत रुजू होता. सन १९८५-८६ पासून नोकर बोनस देणे बंद केले आहे. संस्थेने सन १९७६-७७ ते १९८४-८५ पर्यंत एकूण नफ्याच्या सरासरी १.८८% एवढी रक्कम बोनस म्हणून दिली.

(५) तारणपत्र किंमत चढ उतार निधी :

ज्या संस्थेने आपल्या खेळत्या भांडवलाच्या १०% पेक्षा जादा रक्कम तारणपत्रात गुंतवलेली असेल अशा प्रत्येक संस्थेने तारणपत्र किंमत चढ उतार निधी स्थापन करणे आवश्यक आहे. तारण पत्रातील विल्हेवाट लावण्यात आल्यामुळे त्यातून निर्माण होणारे अपेक्षित नुकसान भरुन निघेपर्यंत आवश्यक असणारी रक्कम निधीत जमा होईपर्यंत प्रत्येक वर्षी शिल्लक नफ्यातून १% एवढी रक्कम निधीत जमा केली जाते. कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेने सन १९८४-८५ पर्यंत या निधीत एकूण नफ्याच्या ०.१२% रक्कम जमा केली आहे.

(६) धर्मादाय निधी :

या निधीचा वापर सार्वजनिक संस्थांना देणग्या देण्यासाठी केला जातो. त्याचप्रमाणे धार्मिक उत्सवासाठी केला जाणाऱ्या विधीवरती हा निधी

खर्च केला जातो. कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था निव्वळ नफ्याच्या २०% एवढी रक्कम या निधीत जमा करते. कोष्टक क्रमांक ४:६ असे दिसते की, १९७६-७७ ते १९९१-९२ या कालावधीत संस्थेने एकूण नफ्याच्या सरासरी १.८०% रक्कम या निधीत जमा केली आहे.

(७) इमारत निधी :

कोणत्याही सहकारी संस्थेस स्वमालकीची इमारत असणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक असणारी रक्कम एकदम उभा करणे अशक्य आहे. त्यामुळे नफ्यातून काही भाग इमारत निधीत जमा केला जातो. त्यामुळे इतर कोणत्याही वित्तीय संस्थेच्या मदती शिवाय कोणतीही संस्था आपली इमारत उभी करु शकते. कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेच्या निव्वळ नफ्यातून २०% रक्कम सध्या या निधीत जमा केली जाते. सन १९९१-९२ अखेर या निधीत २,४२,४५०.०० रुपये जमा झाली आहे.

(८) विनावेतन काम करणाऱ्यांचे मानधन :

शिल्लक नफ्याच्या २ % पर्यंत विनावेतन काम करणाऱ्यांना सदरचे मानधन अदा केले जाते. संस्थेच्या सन १९७९-८० ते १९८२-८३ अखेरीस या चारच वर्षात या स्वरुपाचे मानधन अदा केले आहे. ते एकूण नफ्याच्या सरासरी १.९१ टक्के एवढी आहे.

(९) सभासद कल्याण निधी :

या निधीत सध्या निव्वळ नफ्याच्या १०% एवढी रक्कम जमा केली जाते. या निधीचा वापर सभासदांच्या मुलामुलींचे शिक्षण, आजारपण, अकस्मात निधन व नैसर्गिक आपत्तीच्या वेळी त्यांची आर्थिक परिस्थीती पाहून त्यांना अगर त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करणे-

साठी केला जातो. तसेच मयत सभासदाकडे या संस्थेचे कर्ज असेल तर तो कर्ज बोजा कमी करणेसाठी या निधीचा वापर केला जातो. संस्थेने सन १९७९-८० पासून हा निधी जमा करण्यास सुरुवात केली आहे. या निधीत एकूण नफ्याच्या १ % किंवा त्या पेक्षा कमी रक्कम जमा केली जाते.

(१०) स्पेशल इमर्जन्सी रिझर्व्ह फंड :

या निधीत शिल्लक नफ्याच्या २०% एवढी रक्कम जमा केली जाते. निसर्ग निर्मीत अगर मानव निर्मीत अगर अन्य भौतिक परिस्थीती-जन्य आपत्ती ओढवली असता संस्थेच्या आणिबाणीच्या कालावधीत या फंडाचा विनियोग केला जातो. सन १९७९-८० ते १९८४-८५ या कालावधीत हा निधी उभा केला होता. व या निधीत एकूण नफ्याच्या सरासरी ०.९२% रक्कम जमा केलेली दिसते. पण कालांतराने संस्था आर्थिकदृष्ट्या सुस्थिर बनल्याने हा निधी बंद करण्यात आला.

(११) बुडीत कर्ज निधी :

सहकारी कायद्यानुसार संस्थेस बुडीत कर्ज निधी उभा करावा लागतो. पगारदार नोकरांच्या पतसंस्थेत कर्ज बुडण्याची शक्यता नसते. तरीसुध्दा काही कारणांमुळे कर्ज बुडण्याची शक्यता निर्माण झाली तर या निधीच्या सहाय्याने ते कर्ज भरुन काढले जाते. कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेने १९८५-८६ पासून असा निधी उभा करण्यास सुरुवात केली. या निधीत निव्वळ नफ्याच्या २०% एवढी रक्कम जमा केली जाते. सन १९८५-८६ ते १९९१-९२ या काळात एकूण नफ्यातून सरासरी ०.८७% एवढी रक्कम जमा केली आहे.

(१२) इतर उपयुक्त कारण निधी :

हा निधी निव्वळ नफ्याच्या १०% प्रमाणात उभा केला जातो. या निधीचा वापर सभासदांच्या मुलामुलींना तसेच सभासद काम करीत असलेल्या संस्थेतील इतर विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षिसे आदि शैक्षणिक उपक्रमासाठी केला जातो. कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेने या निधीत एकूण नफ्याच्या स रासरी ०.५७ % रक्कम जमा केली आहे.

(१३) शिल्लक नफा :

संस्थेच्या उपविधीनुसार एकूण नफ्यातून रिझर्व्ह फंड आणि वर्षा अखेरीस भागभांडवलावर १२ % दराने लाभांश वाटप केल्यानंतर जी रक्कम शिल्लक रहाते त्यास शिल्लक नफा असे संबोधले जाते. या शिल्लक नफ्याची विभागणी विविध निधीत केली जाते. आणि शिल्लक नफ्यातून विविध निधी वजा जाता जो नफा शिल्लक रहातो तो पुढील वित्तीय वर्षात शिल्लक नफा म्हणून दर्शविला जातो. कोष्टक क्रमांक ४:५ मध्ये सन १९७६-७७ ते १९८४-८५ या कालावधीत एकूण नफ्याच्या सरासरी १.७६% एवढी रक्कम शिल्लक नफा दिसते.